ठाणे, बुधवार दि.७ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : १०० , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**भाजपाचे फोल वचन आणि वाद**

राज्यपाल पदासाठी शिंदे गट आणि भाजपा यांच्यात वाद सुरू झाला आहे. याचे कारण म्हणजे माजी खासदार आनंदराव अडसूळ हे शिंदे गटाचे नेते आहेत ......पान २ वर



**विरोधीपक्ष विषाप्रमाणे काम करतोय : आ. संजय केळकर यांचा घणाघात**

...पान ४ वर

# राज्यातील भटक्या जमातीमध्ये नव्या जातीचा समावेश



**मागासवर्ग (ओबीसी) व भटक्या विमुक्त जमाती घटकात चार नव्या व ४६ उपजातींचा नव्याने समावेश**

नागपूर – राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार, इतर मागासवर्ग (ओबीसी) व भटक्या विमुक्त जमाती घटकात चार नव्या व ४६ उपजातींचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. आयोगाने शासनास सादर केलेल्या २३ ते ४३ अहवालातील शिफारशीनुसार हा निर्णय घेण्यात आला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने यासंदर्भातील आदेश जारी केला.मागासवर्गीयांच्या (ओबीसी) यादीमध्ये नव्याने समावेश करण्यात आलेल्या यादीत राठोड (आर्थिक निकषाच्या अधीन राहून), मारवाडी न्हावी, गुरडी, गुटरडी–कापेवार, गुराडी, गुर्डा–कोपेवार, गुरड–कापू व गुरडी–रेडडी या जातींचा समावेश आहे.



**नव्या बदलानुसार यापुढे....**

- ठेलारी ही जात भटक्या जमाती (ब)' यादीतील अ.क्र. २७ येथून वगळून भटक्या जमाती (क)' यादीतील अ.क्र.२९ मध्ये धनगर जातीची तत्सम जात म्हणून समावेश करण्यात आला आहे.
- केवट–तागवाले या जातीचा भटक्या जमाती (ब) मध्ये समावेश करण्यात आला आहे.
- आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्ग यादीतील अ. क्र. १८२ मधील माळी, बागवान, राईन (बागवान) समोर कुंजडा या जातीचा समावेश करण्यात आला आहे.
- याबाबतचा शासनादेश आज निर्गमित करण्यात आला आहे. हा शासनादेश www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**धनगर समाज संघर्ष समितीने मानले आभार**

ठेलारी जातीचा धनगर जातीमध्ये समावेश करण्यात आल्याने धनगर समाज संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांची मंत्रालयात भेट घेऊन आभार व्यक्त केले. यावेळी माजी खासदार डॉ. विकास महात्मे, अनंत बनसोडे, विठ्ठल मारनर, वामनराव मारनपावबा गोयेकर, देवा गोयेकर, बापू कोलपे आदी उपस्थित होते.

मुंबई – भटक्या जमातीत बागडी (भज–ब) या नव्या जातीचा समावेश करण्यात आला आहे. ओबीसीतून लाडशाखीय वाणी व बागडी या जाती वगळण्यात आल्या आहेत. ओबीसीत जंगम (मालाजंगम/वीरभद्र), काथार, काथारवाणी (लाडशाखीय वाणी), देवाडिगा (शेरीगार व मोईली) यादव (अहिर), शिंपी, दर्जी (तेलगु दर्जी,तेलगू शिंपी), कची (कोइरी, कोईरी, कोयरी व कुशवाहा), पंचमा (पंचम), विनकर (बुनकर) या जातींचा तसेच तत्सम वा उपजातींचा समावेश करण्यात आला आहे.भटक्या जमातीच्या यादीत भोई/भज–ब (निषाद, मल्ला, मल्लाह, नाविक, ओडा,), ओडेवार, ओडेलू, बेस्तार, बेस्ता, बेस्ती, बेस्तालू, भनार, लोहार/भज–ब (चितारी/जिनगर), धनगर/भज–क (धनगर अहिर), धनगर/भज–क (गडरिया/गडारिया), सिक्कलगर/भज–ब (पान २ वर)

ई–पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,२८० | ९३,६८० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार

**थोडक्यात घडामोडी**

## आज पार पडणार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील चरित्रग्रंथाचा प्रकाशन सोहळा!

ठाणे : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आजवरचा जीवनप्रवास शब्दबद्ध करण्यात आलेल्या 'योद्धा कर्मयोगी : एकनाथ संभाजी शिंदे' या प्रा. डॉ. प्रदीप ढवळ लिखित चरित्रग्रंथाचा प्रकाशन सोहळा आज, बुधवारी, ०७ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, विधान परिषद उपसभापती नीलम गोऱ्हे, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील सदस्य आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या हस्ते ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतनमध्ये सायंकाळी ५ वाजता हा प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे.

## दादर स्टेशनवर सुटकेसमध्ये आढळला मृतदेह

**झडती घेताच आरपीएफ जवानांचाही उडाला थरकाप!**

मुंबई : दादर रेल्वे स्थानकावर चक्क एका सुटकेसमध्ये मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. सोमवारी सायंकाळी तुतारी एक्सप्रेसने प्रवास करण्यासाठी निघालेल्या दोन प्रवाशांकडील ट्रॉली बॅगेत रक्ताने माखलेला मृतदेह आढळून आला. मुंबईतील पायधुनी परिसरात ही हत्या घडल्यामुळे या प्रकरणाचा तपास पायधुनी पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, रेल्वे पोलिसांमुळे अवघ्या चार तासांत या गुन्ह्याची उकल करण्यात पायधुनी पोलिसांना यश आलं आहे. मात्र, आरोपी हे मुकबधीर असल्याने त्यांच्याकडून गुन्ह्यासाठी जबाब नोंदवून घेण्यासाठी पोलिसांनी साईन लँग्वेज एक्सपर्टची मदत घेतली. याप्रकरणी दोन आरोपींना अटक केली आहे.(सविस्तर वृत्त पान ३ वर)



- सुटकेस घेवून जाणारे आरोपी मूकबधीर
- साईन लँग्वेज एक्सपर्टची मदत घेतली

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शरद पवार यांच्या बंगल्याबाहेर सुरक्षा वाढवली

मुंबई : राज्यामध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दा मागील अनेक महिन्यांपासून ऐरणीवर आलेला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या कडक उपोषणानंतर हा मुद्दा चर्चेत आला. लोकसभा निवडणूकांवर देखील मराठा आरक्षणाचा प्रभाव दिसून आला होता. आता आगामी विधानसभा निवडणूकीच्या पूर्वी देखील मराठा आरक्षण हा फॅक्टर महत्त्वाचा ठरणार आहे. मराठा क्रांती ठोक मोर्चा आज सिल्व्हर ओक आणि सागर बंगल्यावर धडकणार आहे. त्यामुळे दोन्ही बंगल्याबाहेर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला सुरक्षिततेमध्ये वाढ करण्यात आली आहे. (पान २ वर)

**सिल्व्हर ओकची सुरक्षा वाढवली**

देवेंद्र फडणवीस यांचा सागर बंगला ते शरद पवार यांचा सिल्व्हर ओक बंगला असा मोर्चा काढण्यात येणार आहे. मराठा क्रांती ठोक मोर्चाच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी या दोन्ही नेत्यांनी मराठा आरक्षणाबाबत भूमिका मांडावी असे मत व्यक्त केले आहे. शरद पवार यांनी मंडळ आयोग आणले. मात्र आता समाजासाठी हे नेते का एकत्र येत नाही. मराठा समाज हा आर्थिक दुर्बल असा आहे. त्यामुळे आम्हाला शैक्षणिक आणि इतर आरक्षण टिकणारे पाहिजे. मराठा आरक्षण प्रश्न सरकारने आणि इतर नेते मंडळींनी लवकरात लवकर मार्गी लावावा. केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आहे. बांगलादेशमध्ये काय झाले, हे बघत आहात. त्यामुळे आमचा उद्रेक बघू नका, असा इशारा मराठा क्रांती ठोक मोर्चा समन्वयक रमेश केरे पाटील यांनी दिला आहे.




नवीन ॲपद्वारे VIDEO KYC द्वारे

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना घरबसल्या हयातनामा दाखल करण्याची सुविधा उपलब्ध

भिवंडी – भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे एकूण २३९५ कर्मचारी हे निवृत्ती वेतन धारक आहेत. या कर्मचाऱ्यांना प्रत्येक वर्षी माहे नोव्हेंबरमध्ये हयातनामा (LIFE CERTIFICATE) दाखल करण्यासाठी महानगरपालिकेत यावे लागते. यामधील बरेचशे कर्मचारी हे वयोवृद्ध असून, काहीजण आजारी असतात. तर काही कर्मचारी हे त्यांच्या मूळ गावी वास्तव्यास गेल्याने या कर्मचाऱ्यांना प्रत्येक वर्षी नोव्हेंबर महिन्यात हयातनामा (LIFE CERTIFIC-TE) दाखल करता येत नाही. यामुळे त्यांना मिळणारे निवृत्ती वेतन हे महानगरपालिकेमार्फत गोठविण्यात येते. यामुळे या कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. याबाबत अनेक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी प्रशासक तथा आयुक्त यांना प्रत्यक्ष भेटून याबाबत मार्ग काढण्याची विनंती केली होती.

या सर्व गोष्टींचा विचार करुन भिवंडी महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांनी सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सोईसाठी भविष्य निधि विभाग प्रमुख श्रीकांत परदेशी यांना याबाबत कार्यवाही करण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार भविष्य निर्वाह विभागाने हयातनामा (LIFE CERTIFIC-TE) दाखल करण्याकरिता आज्ञाप्रणाली विकसीत केली असून, या आज्ञाप्रणालीमध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची नोंदणी करुन, प्रत्येक वर्षी माहे .(पान २ वर)



- भिवंडी महानगरपालिका प्रशासनाचा मोठा निर्णय
- पेंशनधारकांना दिलासा

**आयुक्तांच्या हस्ते सेवेचा शुभारंभ**

प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांचे शुभहस्ते ०५ ऑगस्ट २०२४ रोजी सदरची आज्ञाप्रणाली कार्यान्वीत करुन या सेवेचा शुभारंभ केला. सेवानिवृत्त कर्मचारी यांनी या ॲपचा वापर करावा व आपल्या हयातीचे प्रमाणपत्र नोंदवावे असे आवाहन पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी केले.

## ठाणेकरांचा प्रवास गारेगार होणार

ठाणे – ठाणेकरांना दिलासा देणारी बातमी हाती आली आहे. ठाणे महापालिकेच्या परिवहन सेवेत नव्या १२३ इलेक्ट्रिक बस दाखल झाल्या आहेत. तसेत उर्वरित १८० इलेक्ट्रिक एसी बस घेण्यासाठी देखील निविदा मागवण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित एसी बस टप्याटप्याने नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहे. यामुळे ठाणेकरांना प्रवास गारेगार होणार आहे.

ठाणेकरांच्या सेवेत १० डबल डेकर बसचा देशील समावेश असणार आहे. या डबल डेकर बसच्या सफारीचा आनंद ठाणेकरांना वर्षभरात घेता येणार आहे. पीएमई योजनेअंतर्गत आणखी १०० बस वर्षभरात दाखल होणार असल्याची देखील माहिती हाती आली आहे. त्यामुळे ठाणेकरांचा प्रवास आणखी सुखकर होण्याची शक्यता आहे. ठाणे परिवहन सेवेत ३६० बस आहेत. या बस ठाण्यासह बोरिवली, मुंबई, भिवंडी आदींसह इतर मार्गावर धावत आहेत. ३६० पैकी १२३ बस या इलेक्ट्रिक वातानुकुलीत बस आहेत.

आर्थिक वर्षात परिवहनच्या अर्थसंकल्पात डबल डेकर बसचा उल्लेख करण्यात आला होता. त्यानंतर बस आल्यानंतर (पान २ वर)



- डबल डेकर बसच्या सफारीचाही आनंद घेता येणार...

**मुंबईत बेस्ट सेवेसाठी आंदोलन...**

मुंबई बेस्ट बस सेवेचा मुद्दा बेस्ट बचाओ आंदोलनाने घेतला आहे. मुंबई महानगरपालिकेने नव्या बस गाड्या विकत घेण्यासाठी बेस्ट प्रशासनाला लवकरात लवकर निधी दिला नाही, तर डिसेंबर २०२५ नंतर बेस्ट ही सार्वजनिक परिवहन सेवा बंद पडेल, अशी भीती बेस्ट बाचाओकडून व्यक्त होत आहे. यासाठी ७ ऑगस्ट ते १० ऑगस्ट दरम्यान निवेदन दिलं जाणार आहे.

## 'लाडकी बहीण योजने'ची रक्कम वाढणार?

**अजित पवारांनी दिले संकेत**

मुंबई – 'माझी लाडकी बहीण योजने'वरुन राज्यात सत्ताधारी आणि विरोधक आमने–सामने गमावले आहेत. या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर भार पडेल असा दावा करण्यात आला आहे. तसंच याप्रकरणी मुंबई हायकोर्टात ाचिकाही दाखल करण्यात आली आहे. कोर्टाने मात्र ही याचिका फेटाळली असून 'लाडकी बहीण' कल्याणकारी योजना असल्याचं म्हटलं आहे. यादरम्यान अजित पवारांनी एक्सवर पोस्ट शेअर करत विरोधकांना प्रत्युत्तर दिलं आहे. यावेळी त्यांनी आगामी काळात योजनेची रक्कम (पान २ वर)

**अजित पवारांच्या पोस्टमध्ये काय?**

'माझी लाडकी बहीण योजना' टिकवणं शक्य नसल्याचं विरोधी पक्ष सांगत आहेत. परंतु अशक्य गोष्ट शक्य करणं हीच माझी ओळख आहे. तोच माझा स्वाभिमान आहे. ही कल्याणकारी योजना विरोधकांना बंद पाडायची आहे, तसं त्यांनी स्पष्ट देखील केलं आहे कारण, ही योजना यशस्वीपणे राबवणं अशक्य आहे असं त्यांचे भाकित आहे. परंतु येत्या काळात या योजनेला अधिक बळकटी देवून या योजनेची रक्कम वाढवण्यासाठी मी सर्वोतोपरी प्रयत्न करेन. ही निवडणूक महिलांच्या हितासाठी आणि विरोधात असणाऱ्यांमध्ये आहे, असं अजित पवारांनी पोस्टमध्ये लिहिलं आहे.




ठाणे येथे विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि सकल हिंदुत्ववादी संघटनाच्यावतीने यशश्री शिंदे, अक्षता म्हात्रे आणि बजरंग दलाचे धारावीतील कार्यकर्ते अरविंद वैश्य यांच्या निर्घृण हत्येच्या निषेध करण्यात आले आणि आरोपींना कठोर शिक्षा द्यावी. या मागणी बरोबरच श्रद्धांजली वाहण्यात आले यावेळी भाजप चे ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, सचिन पाटील, विलास साठे, आशुतोष तिवारी,सहमंत्री, ठाणे विभाग, विश्व हिंदू परिषद यांचा सहा हिंदू समाज मोठ्या संख्याने उपस्थित होते. (छाया, मनोज सिंह)

## क्रॉस व्होटिंग भोवणार; विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या 'त्या' ५ आमदारांचा पत्ता कट

मुंबई – विधान परिषद निवडणुकीत क्रॉस वॉटिंग करणे काँग्रेसच्या आमदारांना चांगलेच महागात पडणार आहे. विधान परिषद निवडणुकीत क्रॉस वॉटिंग करणाऱ्या काँग्रेसच्या पाच आमदारांचा पत्ता कट होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत यांना तिकीट मिळणार नाही.

आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या ५ आमदारांचा पत्ता कट होण्याची शक्यता आहे. सूत्रांकडून ही माहिती मिळाली आहे. विधान परिषदेत विरोधात वोटिंग करणाऱ्या आमदारांचा पत्ता कट होणार असल्याचं सूत्रांकडून समजते. काँग्रेस हायकमांडने पाच आमदारांना तिकीट देऊ नका असे आदेश दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. त्याचबरोबर ५ मतदार संघात नवीन चेहऱ्यांना संधी देण्याचे नाना पटोले यांना काँग्रेस हाय कमांडने आदेश दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.



**कोण आहेत काँग्रेसचे बंडखोर आमदार**

- सुलभा खोडके – अमरावती
- झिशान सिद्दीकी – वांद्रे पूर्व
- हिरामन खोसकर – इगतपुरी
- जितेश अंतापूरकर – नांदेड दक्षिण
- मोहन हंबर्डे – देगलूर

**विधान परिषद निवडणुकीत नेमकं काय झाले?**

विधानपरिषद निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार मिलिंद नार्वेकर विजयी झाले. मात्र या निवडणुकीआधी महाविकास आघाडीत मोठं राजकीय नाट्य घडलं. शिवसेना ठाकरे गटाचे केवळ १६ आमदार आहेत. विजयासाठी २३ मतांची गरज होती. उर्वरित ७ मतांसाठी नार्वेकर काँग्रेसच्या अतिरिक्त मतांवर अवलंबून होते. ही मतं पदरात पाडून घेण्यासाठी ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये मोठा वाद झाल्याची चर्चा आहे. मिलिंद नार्वे करांना मतं द्यायची की, शेकापच्या जयंत पाटलांना? यावरून काँग्रेसमध्ये दोन गट पडले. पृथ्वीराज चव्हाण, सतेज पाटील, नसीम खान, नाना पटोलेंनी ठाकरेंच्या बाजूनं कौल दिला तर विजय वडेट्टीवार आणि बाळासाहेब थोरात जयंत पाटलांना मतं देण्याच्या बाजूनं होतं. ज्या ८ आमदारांचा कोटा काँग्रेसनं ठरवून दिला त्या आमदारांवर ठाकरेंचा विश्वास नव्हता. ते आमदार क्रॉस व्होटिंग करतील आणि नार्वे करांना दगाफटका होईल, अशी भीती ठाकरेंना वाटत होती.अखेर शिवसेना ठाकरे गटाला ज्याची भीती होती, तेच घडलं... काँग्रेसच्या काही आमदारांनी क्रॉस व्होटिंग केलं. त्यामुळं जयंत पाटील हे महाविकास आघाडीचे तिसरे उमेदवार पराभूत झाले... ठाकरे गटाचे नार्वेकर आमदार म्हणून विजयी झाले..

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शरद पवार यांच्या बंगल्याबाहेर सुरक्षा वाढवली

**(पान १ वरून) सागर बंगल्याबाहेर आंदोलकांची घोषणाबाजी** – मराठा क्रांती ठोक मोर्चेने यापूर्वी ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थान असलेल्या मातोश्रीबाहेर असेच आंदोलन केले होते. उद्धव ठाकरे यांनी मराठा आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करावी असे या आंदोलकांचे म्हणणे होते. त्यानंतर आता मराठा क्रांती ठोक मोर्चाच्या रडारवर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जेष्ठ नेते राज्यसभा खासदार शरद पवार हे दोन नेते आहेत. उपमुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थान असलेल्या सागर बंगल्यावर आंदोलन धडकले आहेत. सकाळी १० वाजल्यापासून आंदोलकांनी सागर बंगल्याबाहेर गर्दी केली आहे. तसेच जवाब दो जवाब दो, देवेंद्र फडणवीस जवाब दो अशी घोषणाबाजी देखील केली आहे. बंगल्याबाहेर कडोकोट बंदोबस्त असून परिसरामध्ये बॅरिकेट्स लावण्यात आले आहे.

## राज्यातील भटक्या जमातीमध्ये नव्या जातींचा समावेश

**(पान १ वरून)** (कातारी-शिकलकर (शिकलीकरी) हिंदूधर्मीयांसह, बेलदार/भज-ब (मुस्लीम राज, मुसलमान राज, मुस्लीम मेमार, मेमार, मुस्लीम गवंडी) यांचा समावेश करण्यात आला आहे. भटक्या जमातीच्या मूळ जातीत या दुरूस्ती करण्यात आल्या आहेत- मूळ जात बेलदार/भज-ब मधून बेलदार कापेवार, बेलदार मुन्नर कापेवार,बेलदार मुन्नर कापू, बेलदार तलंगा, बेलदार तलंगी, बेलदार,बेलदार पेंटरेडडी व बेलदार बुकेकरी या उपजातीसमोरील बेलदार हा शब्द वगळण्यात आला आहे.

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना घरबसल्या हयातनामा दाखल करण्याची सुविधा उपलब्ध

**(पान १ वरून)** नोव्हेंबर मध्ये दुरदृष्यप्रणाली (VIDEO KYC) द्वारे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे हयात नामे दाखल करुन घेण्यात येतील. यामुळे कर्मचाऱ्यांना होणारा त्रास कमी होऊन ते भारतात अथवा जगाच्या कोणत्याही ठिकाणाहून घरबसल्या त्यांचे हयातनामे दाखल करु शकतील.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका ही राज्यातील एकमेव महानगरपालिका आहे की, ज्यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना घरबसल्या हयातनामा दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. आजही अनेक राज्य शासकीय अथवा अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सेवानिवृत्त कर्मचारी हे जवळच्या बँक, पोस्ट खाते अथवा त्या त्या कार्यालयात हयातनामा दाखल करण्यासाठी जात असतात. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना शारिरिक व आर्थिक त्रासातुन सुटका मिळाली आहे.

याकामी अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त (मुख्यालय) नयना ससाणे, सहायक आयुक्त (प्रशासन) अजित मनोहर महाडीक, भविष्य निर्वाह निधी विभागाचे विभाग प्रमुख श्रीकांत जगन्नाथ परदेशी आणि भविष्य निर्वाह निधी विभागातील कर्मचाऱ्यांचे आयुक्त महोदयांनी कौतुक करुन हे कार्य महानरगपालिकेच्या इतिहासात कायमस्वरुपी लक्षात राहील असे मत व्यक्त केले असे नमूद केले.

## ठाणेकरांचा प्रवास गारेगार होणार

**(पान १ वरून)** कोणत्या मार्गावर सोडल्या जाऊ शकतात, याचाही अभ्यास करण्यात आला होता. या डबल डेकर बसचा मार्ग देखील आता सुकर होण्याची चिन्हे निर्माण झाली आहे. वर्षभरात ठाणेकरांच्या सेवेसाठी १० डबल डेकर बस दाखल होणार आहेत.

## 'लाडकी बहीण योजने'ची रक्कम वाढणार?

**(पान १ वरून)** वाढवण्याचे संकेतही दिले आहेत. येत्या काळात 'माझी लाडकी बहीण योजने'ला अधिक बळकटी देवून या योजनेची रक्कम वाढवण्यासाठी मी सर्वोतोपरी प्रयत्न करेन. ही निवडणूक महिलांच्या हितासाठी आणि विरोधात असणाऱ्यांमध्ये आहे असं अजित पवार म्हणाले आहेत. कल्याणकारी योजना विरोधकांना बंद पाडायची आहे असा आरोपही त्यांनी केला आहे.



# संपादकीय..

संपादक-चंद्रकांत भोईटे

## भाजपाचे फोल वचन आणि वाद

राज्यपाल पदासाठी शिंदे गट आणि भाजपा यांच्यात वाद सुरू झाला आहे. याचे कारण म्हणजे माजी खासदार आनंदराव अडसूळ हे शिंदे गटाचे नेते आहेत आणि त्यांनी आपल्याला राज्यपाल पद मिळाले नाही तर आपण अनेक गोष्टी उघड करणार असल्याचे म्हटले आहे. यावरून राज्यपाल पदासाठी नेते लोक किती खटपटी करतात हे दिसून आले आहे. यापूर्वी महाराष्ट्रात अनेक राज्यपाल होऊन गेले परंतु गेल्या काही वर्षांत राज्यपाल पद हे संविधानिक न राहता राजकीय स्वरूपाचे झाले आहे असे दिसते. माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनी भाजपाला इशारा दिला आहे की, राज्यपालपदासाठी आठ-दहा दिवस वाट पाहणार अन्यथा नवनीत कौर राणा यांचे जातवैधता प्रमाणपत्राचे प्रकरण बाहेर काढणार. नवनीत कौर राणा यांच्या जातवैधता प्रमाणपत्राचे प्रकरण यामुळे पुन्हा चर्चेत येत आहे. शिंदे गटाचे माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनी आपली बाजू स्पष्ट करत म्हटले आहे की, नुकतीच राष्ट्रपती कार्यालयाने नव्या राज्यपालांची एक यादी प्रसिद्ध केली आहे. यात आठ ते दहा जणांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये कुठेही माझे नाव नाही. याबाबत मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोललो. त्यांना आठवण करून दिली की आपल्याला त्यांनी (भाजपाने) काय आश्वासन दिले होते. सध्या मी संयम ठेवला आहे. अजून आठ-दहा दिवस संयम ठेवेन, थोडी वाट पाहणार आहे, अन्यथा मी सर्वोच्च न्यायालयात क्युरेटीव्ह याचिका दाखल करणार आहे. भाजपाने शिंदे गटाला दिलेला शब्द न पाळल्याने अडसूळ यांनी भाजपाला इशारा दिला आहे. भाजपा प्रादेशिक पक्षाला अनेक आश्वासने देते परंतु ही आश्वासने पाळली जात नाहीत असे दिसून येते. परंतु आगामी विधानसभा निवडणुकीत प्रादेशिक पक्षच भाजपाला आधार देणार आहेत, असे दिसते. सहकारी पक्षाला नाराज करून भाजपा मनमानी कारभार करू शकत नाही. अन्यथा युतीमध्ये बेदिली माजू शकते. त्यामुळे भाजपाने अडसूळ यांच्या इशाऱ्याचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. आनंदराव अडसूळ यांनी भाजपाला त्यांच्या वाचनाची आठवण करून देत म्हटले आहे की, भाजपाने आम्हाला निवडणुकीच्या आधी दिलेला शब्द पाळला नाही आणि ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी निवडणुकीआधी आम्हाला दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही. त्यामुळे माझ्या मनात चीड निर्माण झाली आहे. या सर्व वरिष्ठ मंडळींनी दिलेले आश्वासन पाळायला हवे होते. शब्द देऊन ते (भाजपा) मागे फिरले आहेत. आम्ही मात्र दिलेला शब्द पाळला आहे. मी लोकसभा निवडणूक लढलो नाही. मी ती निवडणूक लढलो असतो. पण आम्ही आश्वासन पूर्ण केले. मी अमरावती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढलो असतो आणि जिंकलो देखील असतो. त्यानंतर आज मी कॅबिनेटमध्ये मंत्री म्हणून दिसलो असतो. कारण माझ्या पक्षात मीच सर्वात वरिष्ठ आहे. तसेच माझ्याकडे मंत्रिपदाचा याआधीचा अनुभव देखील आहे. या सर्व गोष्टी असताना मला डावलले. याची माझ्या मनात चीड आहे. जे काही घडले त्याबद्दल माझ्या मनात खंत का असू नये? असा सवालच अडसूळ यांनी उपस्थित केला आहे. शिंदे गटाचे नेते अडसूळ यांनी पुढे म्हटले आहे की, त्यांना (भाजपा) वाटत असेल माझ्याकडे काय पर्याय आहे. तर माझ्याकडे सर्वोच्च न्यायालयात जाऊन क्युरेटिव्ह याचिका दाखल करण्याचा पर्याय आहे. सध्याची परिस्थिती पाहता मी आणखी १०-१२ दिवस वाट बघेन. या १०-१२ दिवसांत काही घडले नाही तर माझ्याकडे सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय आहे. मला माहिती आहे न्यायालयात कशा पद्धतीने निकाल लागतात. परंतु, माझ्या याचिकेवर सरन्यायाधीशांनी सुनावणी केली तर काही अपेक्षा ठेवायला हरकत नाही. आपल्याला न्याय मिळू शकतो, अशी आशाही अडसूळ यांनी व्यक्त केली आहे. शिवसेनेचे नेते आनंदराव अडसूळ यांनी एकनाथ शिंदे यांच्या बंडावेळी त्यांना समर्थन दिले होते. ते शिवसेनेचे जेष्ठ नेते आहेत. भाजपाने लोकसभा निवडणुकीपूर्वी अडसूळ यांना शब्द दिला होता की, ते त्यांचे राजकीय पुनर्वसन नक्कीच करतील. त्यामुळे अडसूळ लोकसभेच्या निवडणुकीला उभे राहिले नाहीत. आता लोकसभा निवडणूक झाल्यानंतर भाजपाला शिंदे गटाच्या या नेत्याला दिलेली वचन आठवत नाही असे दिसते. अडसूळ यांचे पुनर्वसन करताना त्यांना राज्यपाल पद दिले जाईल अशी अपेक्षा होती. परंतु राष्ट्रपतींनी जाहीर केलेल्या राज्यपालांच्या यादीत अडसूळ यांचे नाव नसलेले दिसून आले. यानंतर अडसूळ यांनी भाजपला निर्वाणीचा इशारा दिला आहे. या इशाऱ्यावर भाजपा श्रेष्ठी नेमका काय विचार करणार यावर पुढील राजकीय गणित अवलंबून आहे असे दिसते. परंतु प्रादेशिक पक्षाला दिलेले वचन भाजपासारख्या राष्ट्रीय पक्षाने पाळणे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपला आवश्यक आहे असे दिसते. त्यामुळे भाजपा याचा गांभीर्याने विचार करेल अशी अपेक्षा ठेवण्यास हरकत नाही.


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक उत्सव प्रसंगी उभारण्यात येणाऱ्या मंडप परवानगीसाठी
ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणेबाबत जाहिर आवाहन

- ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक उत्सव मंडळांना या जाहिर आवाहनाद्वारे सुचित करण्यात येते कि, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक उत्सव (दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रौत्सव इ.) प्रसंगी सार्वजनिक ठिकाणी (रस्ते/पदपथावर) तात्पुरते स्वरुपात मंडप उभारण्याकरिता परवानगी मिळणेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याकरीता ठाणे महागरपालिकेने संगणक प्रणालीची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.
- सार्वजनिक उत्सव मंडळांनी ऑनलाईन सुविधेचा वापर करुन मंडप परवानगीसाठी अर्ज करावेत.
- ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यास मंडळांना पोलीस, वाहतूक पोलीस व अग्निशमन विभागाकडे परवानगीसाठी किंवा ना हरकत दाखल्यासाठी जाण्याची गरज लागणार नाही.
- ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा थेट tmcmandap.vidhsiddinfotechllp.com या लिंकवर व ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर "मंडप परवानगी" या शीर्षाखाली उपलब्ध आहे. सदरची लिंक दि.०४/०९/२०२४ पर्यत सुरु राहणार आहे. त्यापुर्वी सर्व मंडळांनी ऑनलाईन सुविधेचा वापर करुन परवानगीसाठी अर्ज करावेत.
- मंडप परवानगीसाठी केलेल्या ऑनलाईन अर्जासोबत मागील वर्षी दिलेल्या परवानगीची प्रत, मंडप उभारण्यात येणाऱ्या जागेचा रफ नकाशा, मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची नावे व मोबाईल नबरसह यादी व मंडपात अग्निशमन सिलेंडर(Fire Extinguisher) ठेवल्याबाबतचे अधिकृत अनुज्ञप्तीधारकाकडील प्रमाणपत्राची प्रत pdf स्वरुपात अपलोड करावी
- सार्वजनिक उत्सव मंडळांनी दहीहंडी, गणेशोत्सव व नवरात्रौत्सवासाठी सार्वजनिक ठिकाणी तात्पुरते स्वरुपात मंडप उभारण्याकरीता ठाणे महानगरपालिकेच्या धोरणानुसार आवश्यक ती परवानगी घेतल्यानंतरच मंडप उभारण्यास सुरुवात करावी.
- मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार परवानगी पत्राची प्रत मंडप उभारण्याच्या ठिकाणी किंवा मंडपाच्या दर्शनी भागावर लावणे बंधनकारक असेल. परवानगी पत्राची प्रत दर्शनी भागावर न लावल्यास सदरचे मंडप विनापरवानगी उभारले आहे असे गृहीत धरुन सदर मंडळाच्या पदाधिकाऱ्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.
- मंडळांना ऑनलाईन अर्ज करतांना कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवल्यास संबधित प्रभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांचेशी तसेच भ्रमणध्वनी क्र. ८०९७१९२८६८ वर संपर्क साधावा.
- मा.उच्च न्यायालयाचे आदेश, शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व ठाणे महानगरपालिकेच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन सार्वजनिक उत्सव साजरा करावा व ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे.

ठामपा/पिआरओ/अतिक्रमण/ २४५/ २०२४-२५
दि.०६.०८.२०२४
**Pls visit our official web-site**
**www.thanecity.gov.in**

सही/-
उपआयुक्त
अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग
ठाणे महानगरपालिका, ठाणे.



## महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण यांच्या न्यायालयात

जा.क्रं.२०२४/महा.रा.व.न्याया.औ.बाद/कावि/ ४२४
महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण यांचे कार्यालय,
हज हाऊस, पहिला मजला, शासकीय कला
महाविद्यालयाजवळ, छत्रपती संभाजीनगर- ०१
दिनांक:- ०५.०८.२०२४

**अर्जदार:- Mr. Siraj Nijamuddin Sayyed & Ors**
**विरुध्द**
**गैरअर्जदार:- Mr. Anwar Ali Haji Mohd. Sharif Ansari & Ors**

ज्या आर्थी सदर **वक्फ अर्ज क्र. १७४** / २०२४ मधील अर्जदार Mr. Siraj Nijamuddin Sayyed & Ors यांनी वक्फ न्यायाधिकरणात अर्ज दाखल केला आहे.
ज्या अर्थी अर्जातील गैरअर्जदार क्र. 02. Mr. Chiraguddin Nazir Mohd. Khan, R/o. R. No. 1201, Building No. 83, L.B.S. Marg, Ghatkopar 400086. गैरअर्जदार क्र. ०३. Shri Nisar Ahmed Gulam Nabi Inamdar. R/o. Talegaon, Post-Dhamdere, Taluka Sirpur, Dist. pune. गैरअर्जदार क्र. 04. Shri Zakir Hussain Mohtab Shaikh R/o Room No. 110, 102 A Wing. Raheja Park, Gulmohar Society, Kalyan. गैरअर्जदार क्र. 06. Mr. Sameer Dilawar Hussain. R/o. Evershine Embassy, Flat No. 1202, C Wing, Veer Desai Road, Opp. County Club, Andheri (W) Mumbai-400053. यांना न्यायाधिकरणामार्फत रजिष्टर पोष्टाने समन्स पाठविले असता त्यांनी समन्स घेण्यास टाळाटाळ केली व या न्यायाधिकरणांत विहित केलेल्या तारखेस उपस्थित झालेले नाहीत.
त्या अर्थी या जाहीर नोटीसीव्दारे आपणास सुचित करण्यांत येते कि, या न्यायाधिकरणांत उपस्थित राहण्यासाठी दिनांक **२४.०९.२०२४** रोजी सुनावणीची पुढील तारीख ठेवण्यांत आलेली आहे. तरी आपण स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत सदरील प्रकरणांत दिनांक **२४.०९.२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात उपस्थित राहावे, उक्त तारखेवर आपण उपस्थित न राहील्यास आपल्या अनुपस्थितीत सदरचा अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी.

मा. अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश
महा.रा. वक्फ न्या., औरंगाबाद यांचे आदेशावरुन
निशाणी क्र. ३०
आदेश दिनांक :- ३०.०७.२०२४
स्थळ:- औरंगाबाद.

शिक्का

सही/-
सहायक अधीक्षक
महाराष्ट्र राज्य बक्फ न्यायाधिकरण
औरंगाबाद



## मिरा भाईंदर महानगरपालिका

परिवहन उपक्रम
नामदार जगन्नाथ नाना शंकरशेट बस डेपो, आर.टी.ओ कॅम्प कार्यालयाजवळ,
स्वातंत्र सैनिक यशवंत शंकर म्हात्रे मार्ग, घोडबंदर, ता. जि. ठाणे ४०११०७

जा.क्र.मनपा/परि/ १६४ / २०२४-२५ — दिनांक :-०६/०८/२०२४

**शुध्दीपत्रक**

निविदेचे नाव :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधण्यांत आलेल्या उर्वरीत ५७ बस थांब्यावर 'जसे आहे तसे' तत्वावर देवून देखभाल दुरुस्तीसह जाहिरातीचे हक्क प्रदान करणे.
संदर्भ :- जा.क्र. मनपा/परि/१५२/२०२४-२५ दि. २९/०७/२०२४ रोजीची फेरनिविदा सुचना.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाअंतर्गत वरील कामाकरीता जा.क्र. मनपा/परि/१५२/२०२४-२५ दि. २९/०७/२०२४ अन्वये निविदा सुचना, कोकण सकाळ, मुबई तरुण भारत व दै. महाराष्ट्र सम्राट या वृत्तपत्रात व e-tendering website वर प्रसिध्द केलेली आहे.
सदरकामी निविदा सादर करतांना निविदेच्या सर्व साधारण अटी-शर्तीमधील ३ (अ) iv -२ मध्ये The Bidder must have experience in outdoor advertising with 5000 sq.Feet of display area with Government / Semi-Government / ULB'S in last 03 financial years, असे नमुद केलेले आहे. परंतू, त्याऐवजी The Bidder must have experience in outdoor advertising with 3000 sq. Feet of display area with Government / Semi - Government / ULB'S in last 03 financial years, असे वाचावे. सदरचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रात व e-tendering website वर प्रसिध्द करण्यात येत आहे.

जा.क्र मनपा/ मावज /ई २५२१४७१/२०२४-२५
दि. ०६/०८/२०२४

सही/-
(अनिकेत मानोरकर)
अति. आयुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका



## मिरा भाईंदर महानगरपालिका

**पाणी पुरवठा व मलनिःसारण विभाग**
स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे - ४०१ १०१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/पापु व मलनिः/१५/२०२४-२५ — दि. ०६/०८/२०२४

**// जाहिर फेर-निविदा सुचना //**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध कामासाठी ऑनलाईन फेर-निविदा मागविणेत येत आहेत. फेर-निविदा सुचना व निविदा प्रपत्र www.mahatenders.gov.in_ च्या संकेत स्थळावर दि. ०९/०८/२०२४ ते दि. १६/०८/२०२४ रोजी १२.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत. www.mahatenders.gov.in च्या संकेत स्थळावर दि. १६/०८/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

जा. क्र. मनपा/मावज/ई२५२४७५६/२०२४-२५
दि. ०६/०८/२०२४

सही/-
(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

ठिकाण :- भाईंदर
दिनांक :- ०६/०८/२०२४



सत्यमेव जयते

## सहकार, पणन व वस्त्रद्योग विभाग
### उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे शहर, ठाणे यांचे कार्यालय

गांवदेवी भाजी मंडई इमारत, पहिला मजला, गावदेवी मैदानाजवळ, ठाणे (प.) ४००६०२

जा.क्र. उपनि /ठाणे शहर /बी - ४/क.१०१/सुनावणी नोटीस/ १५९४ /सन २०२४-२५
दिनांक :- ३१ / ०७ /२०२४

**जाहिर नोटीस**

**( महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १०१ अन्वये सुनावणी नोटीस )**

ज्याअर्थी अर्जदार **महाराष्ट्र व्यापारी मित्र को.ऑप. क्रेडिट सोसायटी, लि., ठाणे,** शॉप नं. ०१, फालको चेंबर, नेताजी सुभाष चंद्र बोस रोड, कोर्ट नाका, ठाणे (प.) – ४००६०२. या संस्थेने दिनांक २४/०६/२०२४ रोजी या कार्यालयात वसुली दाखला मिळणेसाठी अर्ज केला असून त्या संबंधीची सुनावणी दि.०९/०७/२०२४, ३१/०७/२०२४ रोजी असल्याची नोटीस आपणांस रजिस्टर पोस्टाने पाठविली होती सदर नोटीस अपुर्ण पत्ता अथवा नोटीस मिळूनही आपण हजर राहिला नाहीत. त्याअर्थी आपणांस कळविण्यात येते की सदर प्रकरणी अंतिम सुनावणी दिनांक २१ /०८/२०२४ रोजी दुपारी ०४.०० या कार्यालयात ठेवण्यात आली आहे. तरी सदर दिवशी आपले म्हणणे मांडण्यासाठी आपण स्वत: किंवा आपले प्रतिनिधी मार्फत हजर रहावे याकामी आपण गैरहजर राहिल्यास आपणांस या बाबत काहीही म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहीत धरून आपल्या अनुपस्थितीत वादी संस्थेला दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी देऊन योग्यतो निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | दावा क्रमांक | थकबाकीदार कर्जदाराचे नांव व पत्ता | जामिनदारांचे नांव व पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | ०६/२०२४-२५ | **श्री. राजाराम संतलाल वर्मा** रूम नं. ९५, जय भिम नगर, टी.एम.सी. पाईप लाईन जवळ, कळवा, ठाणे (प.) | **१) श्री. नितीन बाळकृष्ण सुर्वे** १०४, गणेश बाग हौसिंग सोसयटी, सिव्हिल हॉस्पिटल जवळ, धोबी आळी, ठाणे (प.) - ४००६०१. **२) श्री. नवनाथ काळबा सुर्यवंशी** शिवशंकर मंदिरा शेजारी, सुभाष नगर, पोखरण रोड नं. ०२, ठाणे. **३)श्री. भानुदास प्रताप यादव** निळकंठ कुठीर अपार्टमेंट, १ ला मजला, रूम नं. ०१, चेंदणी कोळीवाडा, दत्त मंदिर रोड, ठाणे (प.) - ४००६०१. | **८८३३९/-** |
| २. | ०२/२०२४-२५ | **श्री. लक्ष्मण विठ्ठल विशे** रूम नं. ८०५, ८ वा मजला, आई नगर, कळवा, ठाणे - ४००६०५. | **१) श्री. भाऊ गेणु गरड** प्लॉट नं. १०५, केशव हाईटस, पारसिक नगर, ठाणे - ४००६०५. **२) श्री. तुषार भाऊ गरड** प्लॉट नं. १०५, केशव हाईटस, पारसिक नगर, ठाणे - ४००६०५. | **११४७६०/-** |
| ३. | ०३/२०२४-२५ | **श्री. सुभाष शेटयप्पा ढब** रूम नं. ०६, गंगाविहार धोबी घाट, अय्यप्पा मंदिराजवळ, शांतीनगर, वागळे इस्टेट, ठाणे (प.) - ४००६०४. | **१) श्री. निकेश द्वारकानाथ म्हात्रे** साई अमृत चाळ, ई/०६, शास्त्री नगर, अमृत पार्कच्या बाजुला, पाईप लाईन कळवा, ठाणे - ४००६०५. | **२९३०३८/-** |
| | | | **२) श्री. रामनयन सिद्धी जैस्वार** रूम नं. १०६७, शिवशक्ती चाळ, राम नगर, रोड नं. २८, वागळे इस्टेट, ठाणे (प.) - ४००६०४. | |
| ४. | ०२/२०२४-२५ | **श्री. निकेश द्वारकानाथ म्हात्रे** साई अमृत चाळ, ई/०६, शास्त्री नगर, अमृत पार्कच्या बाजुला, पाईप लाईन कळवा, ठाणे - ४००६०५. | **१) श्री. सुभाष शेटयप्पा ढब** रूम नं. ०६, गंगाविहार धोबी घाट, अय्यप्पा मंदिराजवळ, शांतीनगर, वागळे इस्टेट, ठाणे (प.) - ४००६०४. **२) श्री. रामनयन सिद्धी जैस्वार** रूम नं. १०६७, शिवशक्ती चाळ, राम नगर, रोड नं. २८, वागळे इस्टेट, ठाणे (प.) - ४००६०४. | **२३०९५५/-** |
| ५. | ०७/२०२४-२५ | **श्री. समद नुर सय्यद** हाजुरी दर्गा, गौतम नगर, वागळे इस्टेट, ठाणे (प.) - ४००६०४. | **१) श्री. रामराज हरिनाथ सरोज** आंबेडकर चाळ, हनुमान नगर, रोड नं. २८, वागळे इस्टेट, ठाणे (प.) - ४००६०४. **२) श्री. संतोष भगवतिदिन पाल** रामा पाटील चाळ, हाजुरी गांव, रोड नं. ०९, वागळे इस्टेट, ठाणे (प) - ४००६०४. | **२४८४१२/-** |
| ६. | ०८/२०२४-२५ | **सौ. स्नेहल संजय कदम** १-सी-००१, द्वरका कृष्णस्थळ, सी.एच.एस काशिमिरा जंक्शन जवळ, घोडबंदर रोड, ठाणे. | **१) श्री. लक्ष्मण आहिलु देठे** रूम नं. ५५, शेळके चाळ, पी.एल.लोखंडे मार्ग, आंबेडकर नगर, चेंबुर, टिळक नगर, मुंबई - ४०००८९. **२) श्री. सुरेश गणपत मोरे** सी-३, ट्राजीस्ट कॅम्प, पी.एल.लोखंडे मार्ग, बुद्ध विहाराजवळ, कामगार वसाहत, आंबेडकर नगर, चेंबुर, मुंबई - ४०००८९. **३) श्री. संजय शंकरराव कदम** १-सी-००१, द्वरका कृष्णस्थळ, सी.एच.एस काशिमिरा जंक्शन जवळ, घोडबंदर रोड, ठाणे. | **११४९८८/-** |
| ८. | ०९/२०२४-२५ | **श्री. भानुदास प्रताप यादव** निळकंठ कुठीर अपार्टमेंट, १ ला मजला, रूम नं. ०१, चेंदणी कोळीवाडा, दत्त मंदिर रोड, ठाणे (प.) - ४००६०१. | **१) श्री. नितीन बाळकृष्ण सुर्वे** १०४, गणेश बाग हौसिंग सोसयटी, सिव्हिल हॉस्पिटल जवळ, धोबी आळी, ठाणे (प.) - ४००६०१. **२) श्री. नवनाथ काळबा सुर्यवंशी** शिवशंकर मंदिरा शेजारी, सुभाष नगर, पोखरण रोड नं. ०२, ठाणे. **३) श्री. निजाम नबी शेख** संजय गांधी नगर, ०१, मिलन बिल्डिंगच्या मागे, राबोडी, ठाणे. | **८६९००/-** |
| ९. | १०/२०२४-२५ | **श्री. प्रकाश महादेव जाधव** मु.पो. रायगांव, ता. जावळी, जि. सातारा - ४१५०२०. | **१) श्री. कृष्णकांत राजाराम कारंडे** साईकुंज सी. रूम नं. ०७, तळमजला, यशोधन नगर, ठाणे (प.) - ४००६०४. **२) श्री. बाळकृष्ण धोंडु निचिते** | **२१०१६३/-** |
| | | | रूम नं. ०६, पाईप लाईन जवळ, संत ज्ञानेश्वर नगर, वागळे इस्टेट, ठाणे (प.) - ४००६०४. | |
| | ११/२०२४-२५ | **श्री. रमेश सुधाकर डिघोळे** मु. जळगांव, पो. पिंपळगांव, ता. सिंदखेड राजा, जिल्हा - बुलढाणा - ४४३२०६. | **१) श्री. गजानन सुखदेव आंधळे** रूम नं. ०३, सत्यनारायण चाळ, रामचंद्र नगर, वागळे इस्टेट, ठाणे (प.) - ४००६०४. **२) श्री. मनोहर कमलाकर पाटील** ए-१५, कैलाश हौ.सो., अभिषेक नर्सिंग होम, बर्वे नगर,भटवाडी, घाट्कोपर - ४०००८४ | **७६६९०/-** |

**स्थळ** :- ठाणे
**दिनांक** :- ३१/ ०७ /२०२४

शिक्का

सही/-
**( डॉ. अविनाश भागवत )**
**उपनिबंधक,सहकारी संस्था,**
**ठाणे शहर, ठाणे**

ठाणे महापालिकेने विक्रमी वेळेत केली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्जांची छाननी

# पहिल्या टप्प्यातील 95,000 अर्जांची छाननी पूर्ण

ठाणे (गणेश भोईटे) : राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'साठी अर्ज केलेल्या महिलांच्या, पहिल्या टप्प्यातील ९५ हजार अर्जांची छाननी ठाणे महापालिकेने शनिवार ०३ ऑगस्ट ते सोमवार ०५ ऑगस्ट या तीन दिवसात अहोरात्र काम करून विक्रमी वेळेत पूर्ण केली आहे.



ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिलेल्या निर्देशानुसार महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांचे आवश्यक मनुष्यबळ तसेच संपूर्ण तांत्रिक व्यवस्था महापालिका मुख्यालयात सज्ज करण्यात आली होती. शनिवार ते सोमवार असे तीन दिवस दररोज तीन सत्रांमध्ये अखंडीतपणे काम करून जमा झालेल्या सर्व अर्जांची विगतवार ऑनलाईन तपासणी करण्यात आली. त्यासाठी संगणक संचांचे अद्ययावत नेटवर्क तयार करण्यात आले होते.

अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या नेतृत्वाखाली उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (समाजविकास) अनघा कदम, समाज विकास अधिकारी दशरथ वाघमारे, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप यांनी प्रत्येक सत्रात होणाऱ्या अर्ज पडताळणीचे नियोजन केले. त्यात सूत्रबद्धता आणून जलद गतीने काम मार्गी लावले.

राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीसाठी ठाणे महापालिकेने प्रभाग समितीनिहाय १३७ मदत केंद्रे सुरू केली आहेत. वागळे इस्टेट प्रभाग समिती कार्यालयात त्यासाठी एक वॉर रुमही तयार करण्यात आली आहे. या सर्व मदत केंद्रांवर आलेले अर्ज तसेच ऑनलाईन प्राप्त झालेले अर्ज यांची ऑनलाइन पद्धतीने पात्रता निश्चिती करण्यात आली. त्यात, ठाणे तालुक्यातील ठाणे, नवी मुंबई आणि मिरा-भाईंदर या महापालिका हद्दीतील अर्जांचा समावेश होता.

ठाणे महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केलेल्या या कामाबद्दल महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सोमवारी झालेल्या विभागप्रमुखांच्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त अनघा कदम यांच्यासह सर्व अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचे कौतुक केले. तसेच, पहिल्या टप्प्यात ज्या पद्धतीने सगळ्यांनी काम केले तोच उत्साह दुसऱ्या टप्प्यातही कायम ठेवून या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थी महिलेपर्यंत पोहोचेल, याची दक्षता घ्यावी, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

शासनाच्या निर्देशानुसार, कागदपत्रांची छाननी करून त्याची ऑनलाईन नोंदणी करण्यात आली. त्यासाठी ठाणे महापालिका मुख्यालय येथे संगणक संचांचे नेटवर्क, त्यासोबत महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे तीन सत्रातील गट यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांना अंगणवाडी पर्यवेक्षिकांचीही साथ मिळाली. समाज विकास विभाग आणि माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी विशेष मेहनत घेतली. या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शासनाने दिलेल्या विहित मुदतीत कागदपत्रांची पडताळणी केली. तसेच, अहोरात्र काम करून त्यांची ऑनलाईन तपासणी केली. अहोरात्र काम केल्याने विहित मुदतीत ही पडताळणी करणे शक्य झाल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी दिली.

## २ सप्टेंबरला नवी मुंबई पालिका लोकशाही दिन

नवी मुंबई : महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार माहे सप्टेंबर २०२४ महिन्याचा लोकशाही दिन दि.०२ सप्टेंबर २०२४ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि. १९ ऑगस्ट २०२४ पर्यंत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन पूरक कागदपत्रांसह सादर करावयाचा आहे.

सदर अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक- आस्थापनाविषयक बाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार/ निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी असे सूचित करण्यात येत आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नागरिकांसाठी महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से. १५ ए, किल्लेगांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथे विनामूल्य उपलब्ध असून नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ (Website) www.nmmc.gov.in यावरील डाऊनलोड आयकॉनवरून अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते याची नागरिकांनी नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

## शासकीय आश्रमशाळा रणकोळ मधील ७६ विद्यार्थ्यांना विषबाधा

डहाणू : डहाणू तालुक्यातील रणकोळ येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गांची शासकीय आश्रम शाळा आहे. या आश्रमशाळेतील वसतिगृहात राहणाऱ्या ७६ विद्यार्थ्यांना काल रात्री (दि.५) जेवणामधून विषबाधा झाली. विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांना उपचारासाठी ऐने प्राथमिक आरोग्य केंद्र, कासा उपजिल्हा रुग्णालय, वानगाव ग्रामीण रुग्णालय या ठिकाणी उपचारासाठी दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

काल रात्री रानशेत शासकीय आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांना जेवण झाल्यानंतर मळमळ उलटीचा त्रास सुरू झाला. सुरुवातीला २८ विद्यार्थ्यांना त्रास सुरू झाल्याने उपचारासाठी त्यांना रात्री अडीच वाजता कासा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले . त्यानंतरही बाकीच्या विद्यार्थ्यांनाही मळमळ उलटी जुलाब असा त्रास सुरू झाल्याने वानगाव ग्रामीण रुग्णालयात १६ विद्यार्थ्यांना तर ऐने येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ३० विद्यार्थ्यांना उपचारासाठी दाखल केले. सर्व विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. विद्यार्थ्यांना रात्रीच्या जेवणातून विषबाधा झाली असल्याची शक्यता आहे. आरोग्य विभागाने रात्रीचे जेवण तसेच पाण्याचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले असून प्रयोगशाळेत पाठवले जाणार आहेत.

*शासकीय आश्रम शाळा रानशेत येथील विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांवर उपचार सुरू असून नेमकी विषबाधा कशामुळे झाली याचे कारण शोधण्यासाठी शाळेतील पिण्याचे पाणी तसेच रात्रीच्या जेवणाचे नमुने ताब्यात घेतले असून तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहेत.*

*-संदीप गाडेकर,*
*आरोग्य अधिकारी डहाणू*

## दादर स्टेशनवर सुटकेसमध्ये आढळला मृतदेह

झडती घेताच आरपीएफ जवानांचाही उडाला थरकाप!

मुंबई : राजधानी मुंबईतील मोठं रेल्वे जंक्शन आणि कायम गर्दीनं गजबजलेल्या दादर रेल्वे स्थानकावर चक्क एका सुटकेसमध्ये मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. सोमवारी सायंकाळी तुतारी एक्सप्रेसने (ठरळश्रूर) प्रवास करण्यासाठी निघालेल्या दोन प्रवाशांकडील ट्रॉली बॅगेत रक्ताने माखलेला मृतदेह आढळून आला. प्रथम दर्शनी आरोपी प्रवाशांच्या हालचालीवरुन संशय आल्याने रेल्वे पोलिसांनी चौकशी केली असता बॅगमध्ये मृतदेह असल्याचे निष्पण्ण झाले आहे. मुंबईतील (चींलरळ) पायधुनी परिसरात ही हत्या घडल्यामुळे या प्रकरणाचा तपास पायधुनी पोलिसांकडे (झेश्रळलश) वर्ग करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, रेल्वे पोलिसांमुळे अवघ्या चार तासांत या गुन्ह्याची उकल (उीळाश) करण्यात पायधुनी पोलिसांना यश आलं आहे. मात्र, आरोपी हे मुकबधीर असल्याने त्यांच्याकडून गुन्ह्यासाठी जबाब नोंदवून घेण्यासाठी पोलिसांनी साईन लँग्वेज एक्सपर्टची मदत घेतली. याप्रकरणी दोन आरोपींना अटक केली आहे.

दादर रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक ११ येथे दोन मूकबधीर व्यक्ती तुतारी एक्सप्रेसमध्ये चढत होते. या दोघांकडे चाकं असलेली एक बॅग होती. मात्र, ही बॅग ट्रेनमध्ये चढवताना या दोघांची प्रचंड दमछाक झाली होती. बॅगेच्या वजनामुळे दोघांनाही बॅग रेल्वे गाडीत चढवताना चांगलाच घाम फुटला होता. त्यावेळी या फलाटावर रेल्वे सुरक्षा दलाचे जवान संतोषकुमार यादव आणि पोलीस अंमलदार माधव केंद्रे हे गस्तीवर होते. त्यांना या दोन्ही व्यक्तींची हालचाली बघून संशय आला. त्यामुळे त्यांनी या दोघांना थांबवून बॅग उघडायला सांगितली. ही बॅग उघडल्यानंतर सर्वांनाच धक्का बसला. या बॅगेत रक्ताने माखलेला एक मृतदेह कोंबून ठेवला होता. या मृतदेहाच्या डोक्यावर गंभीर घाव होते. पोलिसांनी संबंधित व्यक्ती आणि बॅग ताब्यात घेऊन पुढील तपासाला सुरुवात केली. या तपासणीत हा मृतदेह अर्शद अली सादिक अली शेख (वय ३०) याचा असल्याचे समजले.

अर्शद हा सांताक्रुझच्या कलिना परिसरात राहायला होता. शिवजित सिंग आणि प्रवीण चावडा या दोन मूकबधिरांनी सादिक अली शेखची हत्या केली. त्यानंतर या दोघांनी त्याच्या मृतदेहाची कोकणात नेऊन विल्हेवाट लावायचे ठरवले होते. त्यासाठी दोघांनी अर्शदचा मृतदेह बॅगेत भरला आणि ते तुतारी एक्स्प्रेसने कोकणात निघाले होते. मात्र, पोलिसांनी संशय येऊन त्यांनी दोघांना हटकल्याने हा सगळा प्रकार उघडकीला आला.



### साईन लँग्वेज एक्सपर्टची मदत घेतली

४ ऑगस्ट रोजीची घटना असून तुतारी एक्सप्रेससाठी आमचा बंदोबस्त लागला होता. त्यावेळी, जनरलच्या डब्ब्याजवळ एक संशयित व्यक्ती मोठी बॅग घेऊन जात होता. विशेष म्हणजे ती बॅग त्या व्यक्तीला उचलली देखील जात नव्हती. त्यामुळे, आमचा संशय बळावला आणि आम्ही त्याची चौकशी केली. आरोपी मुकबधीर असल्याचेही आरपीएफच्या तपासातून समोर आले. त्यामुळे, साईन लँग्वेज एक्सपर्टच्या मदतीने चेहऱ्यावरील हावभाव आणि हातवारे यांमधून आरोपीकडून पोलिसांनी घटनेची माहिती जाणून घेतली. पायधुणी परिसरातून टॅक्सी करुन ते हा मृतदेह घेऊन दादर रेल्वे स्टेशनवर आले होते. यापुढील तपास पायधुणी स्थानिक पोलीस करत आहेत, असे मध्ये रेल्वेचे डीएसपी ऋषीकुमार यांनी एबीपी माझाशी बोलताना सांगितले.

### दुसऱ्या आरोपीलाही केली अटक

प्राथमिक तपासात शिवजित सिंह आणि प्रवीण चावडा या दोघांनी मिळून अर्शद अली शेख याची हत्या केल्याचे समजले. शिवजित सिंह घटनास्थळावरुन पळून गेला होता. मात्र, पोलिसांनी प्रवीण चावडा याच्याकडून माहिती घेऊन त्याला उल्हासनगरमधून ताब्यात घेतले. गुन्ह्यासाठी वापरलेले हत्यारही पोलिसांनी जप्त केले आहे. आता, याप्रकरणाची पुढील तपासणी करुन पोलिसांकडून शिवजित सिंह आणि प्रवीण चावडा या दोघांवर आरोपपत्र दाखल करुन त्यांना न्यायालयासमोर हजर केले जाईल.

## टिएमटीच्या ताफ्यात वर्षभरात १८६ विद्युत बसगाड्या

ठाणे : ठाणे परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात १२३ विद्युत वातानुकूलीत बसगाड्या दाखल झाल्याने ठाणेकरांचा प्रवास गारेगार होत असतानाच, त्यापाठोपाठ आता १५ व्या वित्त आयोगातून १८० विद्युत वातानुकूलीत बसगाड्या परिवहन उपक्रमाला मिळणार आहेत. त्यापैकी ८६ बसगाड्यांबरोबरच केंद्र शासनाच्या पीएम ई बस सेवा योजनेंतर्गत १०० अशा एकूण १८६ विद्युत वातानुकूलीत बसगाड्या वर्षभरात परिवहनच्या ताफ्यात दाखल होणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली. या बसगाड्यांमुळे ठाणेकरांचा प्रवास अधिक सुखकर होण्याची चिन्हे आहेत.

ठाणे महापालिका परिवहन उपक्रम हा ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येतो. या उपक्रमाच्या ताफ्यात एकूण ४०० बसगाड्या आहेत. पैकी ३६० बसगाड्या प्रवासी सुविधेसाठी उपलब्ध होत आहेत. ठाणे शहराची लोकसंख्या २५ लाखांच्या घरात गेली आहे. प्रवाशी संख्येच्या तुलनेत या बसगाड्यांची संख्या अपुरी पडत आहे. यामुळे परिवहनच्या ताफ्यातील बसगाड्यांची संख्या वाढविण्यावर प्रशासनाकडून भर देण्यात येत आहे. त्याचबरोबर शहरातील पर्यावरणाचा समतोल राखला जावा यासाठी पर्यावरणपुरक विद्युत बसगाड्यांची खरेदी केली जात आहे.

## गॅस शवदाहिनीची प्रतीक्षाच, नगर परिषदेचा ऑगस्ट अखेरपर्यंत कार्यान्वित करण्याचा दावा

उरण : शहरातील पहिल्याच वायुवरील शवदाहिनी प्रकल्प उभारण्यात आला आहे. पर्यावरणस्नेही प्रकल्पाची प्रतीक्षा आहे. हा प्रकल्प ऑगस्ट अखेरपर्यंत कार्यान्वित करण्यात येणार असल्याचा दावा उरण नगर परिषदेने केला आहे. उरण नगर परिषदेने शहरातील बोरी येथे एक कोटी खर्च करून हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. यामुळे नागरिकांचा वेळ, पैशाचीही बचत होणार असून पर्यावरणाचे रक्षण व प्रदूषणाला पर्याय ठरणार आहे.

उरण शहरवासीयांसाठी पर्यावरणपूरक वायूवर चालणारी शवदाहिनी बोरी स्मशानभूमीत उभारण्यात आली आहे. सुमारे एक कोटी रुपये खर्च करून उभारलेला गॅसवर आधारित शवदाहिनी प्रकल्प लाकडांवर जळीत करण्यामुळे होणाऱ्या मोठ्या प्रमाणावर प्रदूषणाला पर्याय ठरणारा आहे. त्याशिवाय नाममात्र दराच्या आकारणीमुळे वेळ, पैशाचीही मोठ्या प्रमाणावर बचत होणार असून परिसरातील हा पहिलाच प्रकल्प आहे.

उरण शहराची लोकसंख्या ३५ हजारांहून अधिक आहे. त्यातच परिसरातील वाढत्या औद्योगिक पसाऱ्यामुळे लोकसंख्येत वाढ चालली आहे. त्यामुळे वाढत्या वाहतुकीमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. अपघातातील आणि बेवारस मृतदेहाच्या दिनाचा ताणही उनपला सोसावा लागत आहे. तशी शहरातील लोकसंख्येच्या तुलनेत शहरात बोरी, भवरा, मोरा अशी तीन ठिकाणी स्मशानभूमीची व्यवस्था आहे. वाढते प्रदूषण व वृक्षतोडीमुळे निसर्गाचाही समतोल ढासळत चालला आहे. यावर उपाययोजना म्हणून शासनच पर्यावरणाचे रक्षण आणि प्रदुषण रोखण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. याचाच भाग म्हणून उरण शहरातील स्मशानभूमीमध्येही गॅस शवदाहिनी उभारण्यात आली असून ऑगस्टअखेरपर्यंत सुरू करण्याचा प्रयत्न असल्याची माहिती उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांनी दिली.

दररोज रात्री- अपरात्री मृतदेहांचे दहन करण्यासाठी स्मशानभूमीत येणाऱ्या मृतदेहांची विल्हेवाट लावण्यासाठी मृतांच्या नातेवाईकांना लाकूडफाटा उपलब्ध करून देण्याचे काम उनपला करावे लागते. सध्याच्या प्रचलित पद्धतीनुसार अंत्यविधीसाठी कमीत कमी ५०० ते ७५० किलो लाकूडफाटा लागते. यासाठी साधारणपणे पाच हजारांहून अधिक खर्च करावा लागतो. त्याशिवाय मृतदेहांची राख होईपर्यंत नातेवाईकांसह आलेल्या आप्तेष्टांना नाहक तीन-चार तास अंत्यसंस्कारासाठी ताटकळत स्मशानभूमीतच बसावे लागते.यामुळे मृतांच्या नातेवाईकांना नाहक खर्चाच्या तसेच नाहक वाया जाणाऱ्या वेळेच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याने मनस्तापही सहन करावा लागतो. मात्र उनपच्या या शवदाहिनीमुळे नागरिकांचा त्रास कमी होण्यास मदत मिळणार आहे.

सरळ सेवा भरती; मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते अर्थ विभागातील

## १७ नव नियुक्त उमेदवारांना आदेश प्रदान




ठाणे : सरळ सेवा भरती-२०२३ अंतर्गत अर्थ विभागात निवड झालेल्या उमेदवारांना दि. ०१ ऑगस्ट रोजी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थित उमेदवारांचे अभिनंदन केले.

अर्थ विभागातील कनिष्ठ सहाय्यक लेखा १२ पद, वरिष्ठ सहाय्यक लेखा ०५ पद अशा एकूण १७ नव नियुक्त उमेदवारांना आदेश निर्गमित करण्यात आले आहे. यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर तसेच अर्थ विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत गट - क सरळ सेवा भरती करण्यासाठी ५ ऑगस्ट २०२३ रोजी विविध संवर्गातील २५५ पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. आयबीपीएस या संस्थेद्वारे सदर परिक्षा घेण्यात आली असून काही संवर्गाचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. इतर उर्वरित संवर्गातील निकालामध्ये पात्र उमेदवारांचे कागदपत्रे पडताळणी सुरू असून लवकरच निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.

अवयवदानासंबंधी गैरसमज दूर करण्यासाठी जीवनविद्या मिशन मैदानात

## वाशी रेल्वे स्टेशनच्या प्रांगणात भव्य मानवी साखळीचे आयोजन

नवी मुंबई : भारतात दरवर्षी ३ ऑगस्ट या दिवशी अवयवदान दिन साजरा करण्यात येतो. तर १३ ऑगस्ट या दिवशी जागतिक अवयवदान दिन साजरा करण्यात येतो. अवयवदानासंबंधी लोकांच्या मनात असलेले गैरसमज दूर करणे हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश आहे. यासाठी राज्य सरकारच्या मदतीसाठी सद्गुरु श्री वामनराव पै यांचे जीवनविद्या मिशन मैदानात उतरले आहे.

अवयवदान दिवसाचे औचित्य साधून



माजी खासदार संजीव नाईक, कल्पना नाईक आणि संकल्प नाईक हे देखील या कार्यक्रमास उपस्थित होते. जीवनविद्या मिशनचे विश्वस्त सचिव दीपक काळे, अवयवदान अभियान समिती प्रमुख प्रमोद रासम, विश्वस्त मुल्यमवार, प्रभाकर उंडे हेही यावेळी उपस्थित होते.

जीवनविद्या मिशन नवी मुंबई १, नवी मुंबई २ व नेरुळ या तीन ज्ञानसाधना केंद्रांचे पदाधिकारी, पनवेल ते ऐरोली या विभागातील सक्रिय कार्यकर्ते, महिला, युवा व पुरुष मिळून ४०० पेक्षा अधिक लोकांनी एकत्रित येऊन या मानवी साखळीत सहभाग घेतला होता.

युवा कार्यकर्त्यांनी जनजागृतीसाठी अवयव दान श्रेष्ठ दान या विषयावर आधारित पथनाट्य सादर केले. अनिता मोरे यांनी लिहिलेल्या या पथनाट्याचे दिग्दर्शन कोमल लेकावळे यांनी केले होते. श्रीकांत घाग, डॉ. किर्ती हंपे, प्रसाद कदम, अभिजीत कोदे, विनायक करलकर, संदिप शिर्के यासह अनेक नामधारकांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी आपले योगदान दिले.

तसेच स्वाती संदाशी आणि सुचिता कलगुटकर यांच्या नियोजनाने मंत्रालय परिसरात देखील अवयवदान अभियान स्टॉल लावून नोंदणी करण्यात आली. अवयव निकामी होणे हे जगभरातील लोकांच्या मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे.

## पालिका लोकशाही दिनाचे २ सप्टेंबर रोजी आयोजन

ठाणे : ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन ०२ सप्टेंबर २०२४ रोजी होणार आहे. तरी नागरिकांनी सप्टेंबर महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच दिनांक १९ ऑगस्टपूर्वी त्यांचे अर्ज- निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावे. हे निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र-१ (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.प्रसुधा-१०९९/सीआर-२३/९८/१८-अ, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर- २०१२ पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांची निवेदने न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे आदेश काढण्यात आले आहेत.

मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनामध्ये ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर १ महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

## पालिकेत रिक्त पद भरती सुरु न केल्यास उपोषण

शिव जनरल कामगार सेनेचा इशारा

नवी मुंबई - देशपातळीवर स्वच्छ भारत अभियानात नवी मुंबई महानगरपालिकेने नावलौकिक मिळवला आहे. मात्र स्वच्छता अभियान, विविध शासकीय योजनांसाठी मेहनत घेणार्या कर्मचार्यांना पालिकेने वार्यावर सोडल्याचे दिसत आहे. शासनाचा भरती आदेश असताना देखील पालिकेने आरोग्य, शिक्षण विभागासह विविध आस्थापनात भरती केली नसल्याने त्याचा काम कार्यरत कर्मचार्यांवर पडत आहे. कामाच्या ताणामुळे ७० कर्मचार्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली आहे. ही बाब नावाजलेल्या पालिकेकरीता अशोभनीय असून पालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी ४४ टक्के रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात व इतर प्रक्रिया सुरु करावी, अन्यथा येत्या १२ ऑगस्ट पासून पालिका मुख्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा शिव जनरल कामगार सेनेने दिला आहे.

अध्यक्ष सुशील कारखानीस व सरचिटणीस घन:श्याम नाईक यांच्या माध्यमातून युनिट अध्यक्षविजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिव जनरल कामगार सेनेची नवी मुंबई विभागीय कार्यकारणी गठित झाली आहे. पालिकेतील कामगारांच्या प्रश्नी संघटनेने वाशी येथे एका बैठकीचे आयोजन केले होते.यावेळी हा इशारा देण्यात आला आहे.

युनिट अध्यक्ष विजय पाटील माहिती देताना म्हणाले की, २१ ऑगस्ट २०१७ रोजी मंजूर अर्हता बंधानुसार महापालिकेत २१५ वर्गात अधिकारी व कर्मचारी मिळून ४०१९ पदे भरावी असा शासन निर्णय आहे. तर ३० मार्च २०२१ आकृतीबंध नियमावलीनुसार ४०१९ इतकी पदे भरताना प्रत्येक संवर्गनिहाय अहर्ता अटी शर्ती व नियमांना शासनाने मंजुरी दिली आहे. सन २०१८ पासून पालिकेने ४०१९ कर्मचार्यांच्या खर्चाची तरतूदही केली आहे. मात्र असे असताना देखील पालिकेमध्ये ४०१९ इतक्या मंजूर पदांपैकी २२८५ इतकेच कर्मचारी आपल्याकडे सोपविलेल्या अतिरिक्त कामासह रात्री नऊ वाजेपर्यंत कार्यालयात थांबून सेवा बजावत आहेत.पालिकेत आज मितीस १७४० म्हणजेच ४४ टक्के जागा रिक्त आहेत. त्यातच सन २०२४-२५ मध्ये १८८ अधिकारी-कर्मचारी निवृत्त होणार आहेत.त्यामुळे या रिक्त पदांसाठी महापालिकेने आतापासूनच भरती प्रक्रिया सुरु करुन कर्मचारी उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. याविषयी पालिका आयुक्तांची भेट देखील घेण्यात आली. मात्र प्रशासनाकडून मराठा आरक्षण आणि इतर कारणे पुढे करत केवळ उत्तरांचा भडीमार करण्यात येत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लक्षात घेता जर पालिकेने ही पदे भरली नाहीत तर कार्यरत असणार्या कर्मचार्यांवर कामाचा बोजा अधिक वाढणार आहे.त्यामुळेही भरती प्रक्रिया तातडीने राबवावी, २५ वर्षपेक्षा जास्त काळापासून कार्यरत करार (ठोक मानधन) व कंत्राटी कर्मचार्यांना त्यांच्या आवृत्तीनुसार पालिका सेवेत कायम करावे त्याचप्रमाणे सरळसेवेनुसार नवीन पदभरती झाल्यानंतर अर्हते शिवाय असलेल्या उर्वरीत करार व कंत्राटी कामगारांना पालिकेने सेवेतून कमी करू नये, अशी मागणी संघटनेने केली आहे.




> २५ वर्षापासून बरेच कर्मचारी करार कंत्राटी पध्दतीवर काम करत असून ते कर्मचारी पालिकेचा अविभाज्य घटक बनले आहेत.नियमानुसार त्यांना कायम करण्याच्या या लढ्यामध्ये नवी मुंबईतील प्रत्येक लोकप्रतिनिधीने तसेच सर्व कामगार संघटनांनी एकत्र येऊन जात,पात, धर्म,पक्ष,प्रांत भाषा असा भेदभाव न करता हे कर्मचारी आपल्या कुटुंबातील एक घटक आहेत असे समजून यांना कायम करण्यासाठी या लढ्याला साथ दिली पाहिजे.
>
> **-सुशील कारखानीस,** अध्यक्ष- शिव जनरल कामगार सेना

पालिकेच्या शिक्षण विभागातील अंगणवाडी,बालवाडी सेविका, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आणि शिक्षकेत्तर कर्मचार्यांना देण्यात येणारे वेतन लांबीवर टाकले जाते.त्याचा त्रास कर्मचारी वर्गांना सोसावा लागत आहे.अनेक कर्मचार्यांचे कर्जाचे हप्ता वेळेत भरला जात नसल्याने नाहक त्रास सोसावा लागत आहे. इतर आस्थापनातील कर्मचार्यांप्रमाणे दर महिन्याच्या पाच तारखेला त्यांनाही वेतन देण्यात यावे, आरोग्या विभागाच्या महत्वपूर्ण सेवे बरोबरच अग्निशमन दलामध्ये रिक्त असणारी पदे अशी एकुण १७४० पदे शासन निर्देशानुसार मंजूर असताना देखील पालिका भरत नसल्याने अखेरचा पर्याय म्हणून १२ ऑगस्टपासून उपोषण करण्याचा इशारा कामगार सेनेने दिला आहे.

**भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी जि. ठाणे**

**ई-निविदा सुचना क्र. . २**

**खालील कामे करण्याकरिता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून निविदा मागविण्यता येत आहे.**

| ई-निविदा क्र./कामाचे स्वरुप | ई-निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख |
|---|---|
| जनसंपर्क विभागाकडील ई-निविदा क्र. २ २०२४/२०२५ या वर्षाकरीता महानगरपालिकेकरीता विविध कामांकरीता रिक्षाद्वारे दवंडी देणे करीता खालील कामाची वार्षिक दर मागविण्यत येत आहे.<br>१) ई-निविदा क्र. २ महानगरपालिकेच्या विविध कामांकरीता रिक्षाद्वारे दवंडी देणे बाबत. | दि. १४/०८/२०२४ |

सदर ई-निविदा मनपा संकेतस्थळ mahatenders.gov.in वर दि. ०७/०८/२०२४ पासून ते दि. १४/०८/२०२४ पर्यंत उपलब्ध आहेत. आपल्या ई-निविदा वर नमूद केलेल्या तारखेच्या दु. ३.०० वा. पर्यंत पाठविण्यत याव्यात.

जा. क्र. /ज.सं.वि./९५०
दि. ०६/०८/२०२४

सही/-
उप-आयुक्त (मुख्यालय)
भिवंडी नि. शहर महापगरपालिका

८
००००००



नागपंचमी निमित्त ठाण्यातील बाजारपेठेत लहान मोठ्या आकाराचे मातीचे नाग विक्रीसाठी आले असून लहान मुलांचे आकर्षण ठरत आहेत. छाया : मनोज सिंह)

# मोरबे धरणामधील जलसाठा 90 टक्क्यांवर



नवी मुंबई : जलसंपन्न शहर म्हणून किर्ती असलेल्या नवी मुंबई महापालिकेत मोरबे धरणात कमी पाणीसाठा शिल्लक असल्याने पालिकेला ऐन उन्हाळ्यात विभागवार पाणीकपात करावी लागली होती. परंतु मागील काही दिवसात झालेल्या दमदार पावसामुळे आठवड्यापूर्वीच शहरातील पाणीकपात रद्द करण्यात आली आहे. तर मोरबे धरणक्षेत्रात चांगला पाऊस पडत असल्याने मोरबे धरण ९० टक्क्याहून अधिक भरले आहे. गेल्यावर्षी धरण भरण्यासाठी सप्टेंबर उजाडला होता.परंतु यावर्षी पुढील काही दिवसात चांगला पाऊस झाला तर सुमारे ७०० मिमी पाऊस पडल्यास धरण याच महिन्यात भरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**मागील ३ वर्षांतील ५ ऑगस्टपर्यंतची स्थिती**

| | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|
| ● ५ ऑगस्टचा पाऊस | ५ मिमी. | १०.२० मिमी. | ५१.८० मिमी. |
| ● एकूण पाऊस | २११७ मिमी. | २७५२ मिमी. | २८५३ मिमी. |
| ● धरण पातळी | ८१.९९ मीटर | ८६.२९ मी. | ८६.१८ मी. |
| ● धरणातील जलसाठा | १३६ द.घ.मी. | १७४. ५३३३ द.घ.मी. | १७३.४८१ द.घ.मी. |
| ● धरणातील पाणी टक्केवारी | ७१.२५ | ९१.४३ | ९०.८८ टक्के |

नवी मुंबई महापालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात मागील काही दिवसापासून चांगला पाऊस झाल्याने धरणात चांगला पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. असाच सलग पाऊस पडत राहिल्यास व जवळजवळ ७०० मिमी अजून पाऊस पडल्यास यंदा धरण लवकर भरेल. सध्या मोरबे धरण ९० टक्क्यांपेक्षा अधिक भरले आहे.

**–अरविंद शिंदे,** अतिरिक्त शहर अभियंता

नवी मुंबई महापालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणाची पाणीपातळी मार्च एप्रिलमध्येच झपाट्याने खाली गेली होती. तसेच दुसरीकडे पावसाने ओढ दिल्याने पाणीचिंताही वाढली होती. यंदाच्या पावसाळ्यात ९ जूनपासून पावसाला सुरुवात झाली. परंतु पावसाळा सुरू होऊनही १५ जूनपर्यंत मोरबे धरण परिसरात फक्त ७८. ६० मिमी एवढ्याच पावसाची नोंद झाली होती. त्यामुळे मोरबे धरणात केवळ २६ इतकाच पाणी साठा शिल्लक होता. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये पाणीपुरवठा करताना संध्याकाळच्या पाणी पुरवठयात पालिकेने वाढीव कपात केली होती.

परंतु जुलै महिन्यात दमदार पाऊस झाला आहे. तर ऑगस्ट महिन्यातही सलग व चांगला पाऊस पडत असल्याने सोमवार ५ ऑगस्टपर्यंत मोरबे धरण क्षेत्रामध्ये एकूण २८५३ मिमी इतका पाऊस झालेला आहे. एकीकडे पाणीकपात रद्द झाली असून पुढील काही दिवस असाच चांगला पाऊस पडला तर ७०० मिमी पाऊस पडल्यास मोरबे धरण यंदा महिनाभरापूर्वीच भरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. गेल्यावर्षी २४ सप्टेंबरला मोरबे धरण शंभर टक्के भरले होते. परंतु गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा धरणात अधिक पाऊस झाला असला तरी गेल्यावर्षी धरणात अधिक जलसाठा होता. यावर्षी कडक उन्हाळा व पाण्याची आवश्यकता यामुळे धरणाची पातळी अधिक खाली गेली होती. त्यामुळे यंदा गेल्यावर्षीच्या तुलनेत आजमितीला अधिक पाऊस होऊनही धरणात जलसाठा कमी आहे. परंतू पुढील काही दिवस असाच सलग पाऊस राहिल्यास धरण लवकरच १०० टक्के भरेल अशी माहिती पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिली आहे.

## लाडकी बहीण योजनेचे ८३ टक्के अर्ज वैध

### बहिणींना दोन हप्ते देण्यासाठी इतर योजनांना ब्रेक

मुंबई : बहुचर्चित मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता रक्षाबंधनच्या दिवशी दिला जाणार आहे. त्यासाठी राज्य सरकार सर्व पातळीवर तयारी करत आहे. १ कोटी महिलांना एकाच वेळी दोन हप्ते दिले जाणार आहेत. आतापर्यंत १ कोटी ४० लाख अर्ज दाखल झाले असुन त्यापैकी १ कोटी अर्जांची छानणी ही पूर्ण झालेली आहे. मात्र जोपर्यंत या योजनेचा पहिला हप्ता लाभार्थ्यांना मिळत नाही तोपर्यंत इतर योजनांना ब्रेक लागल्याची माहिती समोर येते.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केलीय. या योजनेचा पहिला हप्ता ररक्षाबंधनच्या मुहूर्तावर दिला जाणार आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचा एकत्रित हप्ता म्हणजेच ३ हजार रुपये लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट जमा होणार आहेत.

*आतापर्यंत या योजनेची वस्तुस्थिती काय?*

- *आतापर्यंत १ कोटी ४० लाख १० हजार २१५ अर्ज ऑनलाईन भरण्यात आले आहेत.*
- *त्यापैकी १ कोटी अर्जांची छाननी करण्यात आलेली आहे.*
- *त्यात ८३ टक्केहून अधिक अर्ज वैध ठरवण्यात आले आहेत.*
- *जवळपास १२ हजार अर्ज अवैध ठरवण्यात आलेले आहेत.*
- *अनेक महिलांनी बँक खात न उघडल्याने अनेक अर्ज अवैध ठरवण्यात आले आहेत.*

एकाच कुटुंबात कोणत्याच महिलांना दुहेरी लाभ मिळणार नाही. मात्र एखाद्या योजनेतून जर १५०० पेक्षा कमी लाभ मिळत असेल तर त्या महिलेला वरचा फरक दिला जाणार आहे. किंवा जास्त लाभ मिळत असेल तर मात्र त्या महिलेला या योजनेचा लाभ मिळणार नाही.

## मोठागाव खाडीत वाळू माफियांच्या बोटी महसूल अधिकाऱ्यांकडून नष्ट

डोंबिवली : डोंबिवली पश्चिमेतील कोपरगाव, मोठागाव भागातील उल्हास खाडीत बेकायदा वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांच्या बोटी, वाळू उपशाचे पंप, बार्जेस महसूल विभागाच्या डोंबिवली विभागाच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी नष्ट केले. खाडी किनारी महसूल अधिकाऱ्यांना पाहताच वाळू तस्कर बोटीतून खाडीत उड्या मारून माणकोली गाव बाजुला पोहत पसार झाले.

मुसळधार पावसाच्या काळात अधिक प्रमाणात वाळू खाडीत वाहून येते. त्यामुळे वाळू माफिया या संधीचा फायदा घेत महसूल अधिकाऱ्यांना चकवा देत खाडीत बेकायदा वाळू उपसा करतात. या वाळू माफियांवर नजर ठेवण्यासाठी आणि त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी महसूल डोंबिवली विभागाचे मंडल अधिकारी दीपक गायकवाड आणि सहकारी तलाठी तहसीलदार सचिन शेजाळ यांच्या आदेशावरून डोंबिवली पश्चिमेतील कोपरगाव, मोठागाव भागात गस्त घालत होते.

ही गस्त घालत असताना मंडल अधिकारी दीपक गायकवाड यांना काही वाळू माफिया कोपरगाव, मोठागाव खाडी हद्दीत बेकायदा वाळू उपसा करत असल्याचे दिसले. गायकवाड यांनी विशेष बोट करून खाडीतील वाळू माफियांपर्यंत जाण्याची तयारी केली. परंतू, काठावरील अधिकारी आपला पाठलाग करून आपणावर कारवाई करतील, या भीतीने रेती उपसा करणाऱ्या बोटीतील मजूर, त्यांचे चालक खाडीला उधाण असताना खाडीत उड्या मारून माणकोली दिशेने पोहत गेले. तेथून खाडी किनाऱ्याला लागून तेथून ते पळून गेले. गायकवाड यांनी या मजुरांना बोटीतच थांबण्याचा इशारा दिला पण ते पळून जाण्यात यशस्वी झाले. इतर बोटींच्या साहाय्याने महसूल अधिकारी खाडीत गेले. वाळू माफियांच्या बोटी मुख्य बोटीला बांधून त्या ओढत खाडी किनारी आणल्या. विष्णुनगर पोलिसांना या प्रकरणाची माहिती देण्यात आली

विष्णुनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार, पोलीस निरीक्षक गहिनाथ नमे, पोलीस उपनिरीक्षक के. पी. देशमुख घटनास्थळी दाखल झाले. महसूल अधिकाऱ्यांनी कामगारांच्या साहाय्याने गॅस कटरच्या माध्यमातून वाळू माफियांच्या बोटी, बार्जेसना छिद्र पाडून या बोटी खाडीत बुडविल्या. काही बोटींना आगी लावून त्यामधील वाळू उपशाच्या सामानासह त्या जाळून टाकल्या. मंडल अधिकारी दीपक गायकवाड यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात वाळू उपसा करणाऱ्या अज्ञात इसमांविरुध्द तक्रार केली आहे.


गेल्या वीस वर्षाच्या कालावधीत वाळू माफियांनी ठाणे, भिवंडी, मुंब्रा, डोंबिवली परिसरातील खाडी किनारा वाळू उपसा करून पोखरून टाकला आहे. या भागातील खारफुटी नष्ट करून जैवविविधता या भागातून नष्ट केली आहे. वाळू माफियांना रोखण्यासाठी महसूल अधिकाऱ्यांची आता डोंबिवली खाडी किनारी भागात नियमित गस्त असते.

> डोंबिवली खाडीकिनारी भागात वाळू माफियांना रोखण्यासाठी दररोज गस्त घातली जाते. त्यामुळे उपसा करणाऱ्या बोटींची संख्या आता कमी झाली आहे. अनेक वेळा वाळू माफिया उपसा बोटी सोडून खाडीत उड्या मारून पळून जातात. त्यामुळे त्यांना पकडणे अवघड होते. त्यांच्या बोटी मात्र तोडमोड करून खाडीत बुडविल्या जातात. काही बोटी जाळून टाकल्या जातात.
> - दीपक गायकवाड मंडल अधिकारी, डोंबिवली विभाग.

## आम्ही झालो लोकराज्य– सामाजिक संस्था..!

### नवी मुंबईतील यशवंतराव चव्हाण फाउंडेशन सामाजिक संस्था झाली राज्यातील पहिली लोकराज्य- सामाजिक संस्था

ठाणे : लोकराज्य या शासनाच्या मुखपत्राचे अनन्यसाधारण महत्व आहे. हे महत्त्व लक्षात घेऊन नवी मुंबईतील यशवंतराव चव्हाण फाउंडेशन, मुंबई या सामाजिक संस्थेने




याविषयी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. संस्थेचे अध्यक्ष संजय रत्नाबाई किसन सावंत, कार्याध्यक्ष सचिन आचरे, अमित शेटे, चंद्रकांत चाळके, कविता कचरे, सुभाष बावडेकर, उपाध्यक्ष प्रकाश बोत्रे, खजिनदार प्रमोद सांळुखे, सचिव संजय आंबुळकर आणि कार्यकारिणी सदस्य जया अलीमचंदानी, चारुशीला शेंडे, विद्याराणी सकटे यांनी या सामाजिक संस्थेतील कार्यरत १०० सभासदांना स्वेच्छेने लोकराज्य मासिकाचे सभासद केले आहे. अशा प्रकारचे लोकराज्य मासिकाचे सदस्यत्व स्वीकारणारी ही सामाजिक संस्था आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील महाराष्ट्र राज्यातील पहिलीच लोकराज्य-सामाजिक संस्था बनली आहे.

या संस्थेकडून सामाजिक, सहकार, आर्थिक, शिक्षण, कृषी, साहित्य कला, क्रीडा, पत्रकार या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विविध मान्यवरांना यशवंतराव चव्हाण पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येते. त्यांचे हे कार्य सलग सात वर्षांपासून सुरू आहे. संस्थेने नवी मुंबई परिसरात यशवंतराव चव्हाण वकृत्व स्पर्धेचे सलग दोन वर्षे आयोजन केले आहे. त्याचप्रमाणे या सामाजिक संस्थेने ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप सलग पाच वर्षे केले आहे.

संस्थेतील सभासदांना महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या लोकाभिमुख निर्णयांची माहिती व्हावी, शासनाकडून जनतेसाठी कशा प्रकारचे निर्णय राबविले जातात, याची माहिती होण्यासाठी हे मासिक निश्चितच उपयुक्त ठरणार आहे, असा विश्वास संस्थेचे सचिव संजय सावंत यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी राज्यातील इतर सामाजिक संस्थांनाही वार्षिक वर्गणी अवघे १०० रुपये असलेल्या उपयुक्त अशा या लोकराज्य मासिकाचे वार्षिक सभासद होण्यासाठी आवाहन केले आहे.

या सामाजिक संस्थेस येत्या दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभाच्या वेळी लोकराज्य पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

## 'योद्धा कर्मयोगी : एकनाथ संभाजी शिंदे' चरित्रग्रंथाचे ठाण्यात होणार प्रकाशन



ठाणे : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आजवरचा जीवनप्रवास शब्दबद्ध करण्यात आलेल्या 'योद्धा कर्मयोगी : एकनाथ संभाजी शिंदे' या प्रा. डॉ. प्रदीप ढवळ लिखित चरित्रग्रंथाचा प्रकाशन सोहळा बुधवारी, ०७ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, विधान परिषद उपसभापती नीलम गोऱ्हे, उद्योग मंत्री उदय सामंत, पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, तसेच ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील सदस्य आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या हस्ते ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतनमध्ये ०७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता हा प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे.

'योद्धा कर्मयोगी : एकनाथ संभाजी शिंदे' या चरित्रग्रंथातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जीवनातील अनेक प्रसंग, घटना विस्ताराने मांडण्यात आल्या असून त्यांची कौटुंबिक वाटचाल, त्यांची जडणघडण, संघर्ष, कष्ट, त्यांचे राज्याच्या विकासातील योगदान या साऱ्याचा लेखाजोखा या ग्रंथात मांडला आहे. ग्रंथाली प्रकाशनाच्या माध्यमातून हा चरित्रग्रंथ प्रसिद्ध होत असून शारदा एज्युकेशन सोसायटी, कोकण मराठी साहित्य परिषद यांच्याद्वारे हा ग्रंथ प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कला, क्रीडा, साहित्य, प्रशासन आदी विविध क्षेत्रांतील मान्यवर, राज्य मंत्रिमंडळातील मंत्री, आमदार, खासदार व अन्य लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा ऐतिहासिक प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे, अशी माहिती या सोहळ्याच्या निमंत्रकांकडून देण्यात आली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय, सामाजिक तसेच कौटुंबिक जीवनातील संघर्षशील प्रवासाचा लेखाजोखा मांडणाऱ्या या चरित्रग्रंथाचे लेखन सुप्रसिद्ध साहित्यिक व नाटककार प्रा. डॉ. प्रदीप ढवळ यांनी केले आहे. एकनाथ शिंदे यांचे कुटुंबीय, नातेवाईक, सहकारी, समकालीन मंडळी, तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या मुलाखतींच्या आधारे हा चरित्रग्रंथ शब्दबद्ध केला आहे. त्यासाठी डॉ. अरुंधती भालेराव, राजन शंकर बने, सान्वी ओक यांनी मोलाचे सहकार्य केल्याचे चरित्रलेखक प्रा. डॉ. प्रदीप ढवळ यांनी सांगितले.

# विरोधीपक्ष विषाप्रमाणे काम करतोय : आ. संजय केळकर यांचा घणाघात

पनवेल : भारतीय जनता पक्ष सत्ता लोकांच्या सेवेसाठी म्हणून बघतो मात्र विरोधक स्वार्थासाठी सत्ता मिळवू पाहत आहे.त्या अनुषंगाने लोकसभा निवडणुकीपासून विरोधकांनी खूप अपप्रचार केला, आणि विष जसे लगेच पसरते त्याप्रमाणे विरोधीपक्ष विषारी काम करत आहेत, अशी घणाघाती टीका ठाण्याचे आमदार संजय केळकर यांनी आज (दि. ०६) येथे केली. भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड जिल्हा विस्तारित कार्यकारिणी बैठक शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडली. त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

यावेळी व्यासपिठावर प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, कोकण विभाग संघटन मंत्री शैलेंद्र दळवी, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ऍड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, अभिजित पेडणेकर, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, कर्जत तालुकाध्यक्ष राजेश भगत, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, खोपोली अध्यक्ष रमेश रेटरेकर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा आश्विनी पाटील, कर्जत विधानसभा संयोजक किरण ठाकरे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर आदी उपस्थित होते. या बैठकीला स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी, विविध सेल मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार संजय केळकर यांनी पुढे बोलताना म्हंटले कि, मोदीजी पंतप्रधान झाल्यापासून आपण जगात एक नंबरवर आहोत. आपल्या देशाचा सर्वांगिण विकास होत असताना आजूबाजूच्या राष्ट्रांनाही मोदीजींनी ताकद दिली आहे. काँग्रेसने त्यांच्या सत्ताकाळात काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत घोटाळे केले. मात्र आता सत्ता हाती लागत नाही हे पाहून समाजामध्ये तेढ करणारे वातावरण निर्माण करण्यात आले आणि जातीपातीचे राजकारण करून बेदाग मोदी सरकाराला बदनाम करण्याचा षडयंत्र रचला




गेला. महिलांच्या सन्मानार्थ योजना राज्य सरकारच्या माध्यमातून अंमलात आणल्या आहे मात्र विरोधकांकडून त्या योजनांच्या बाबतीतही अपप्रचार करण्याचा डाव सुरु झाला आहे. त्यामुळे विरोधकांनाही रडीचा डाव बंद करावा, अशा शब्दात आ. केळकर यांनी खडेबोल सुनावले. एकेकाळी सरपंच झाला तरी आम्ही आनंदाने उडी मारून स्वागत करायचो. लोकसभेत पनवेलने मतांची मोठी आघाडी मिळवून दिली आहे. त्यामुळे पक्षाला अनुकूल वातावरण निर्माण झाले असून आता हा रायगड जिल्हा पूर्णपणे भाजपमय झाला आहे. त्यामुळे उत्तर रायगड जिल्ह्यात सर्व जागा जिंकू असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. 'प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष त्यानंतर स्वतः' हि महत्वाची निष्ठा पक्षाने कधीही बदलली नाही. अंत्योदयाचा विचार पक्षाचा मूळ आधार असून कार्यकर्ता हि भाजपची संपत्ती आहे. ३० वर्षांपूर्वी काँग्रेसने लोकसभेच्या २४० जागा जिंकल्या त्यानंतर कधीही काँग्रेसला जागा जिंकता आल्या नाहीत नापास होऊनही आपण पास झालो आहोत असा अभिर्भाव काँग्रेसकडून केला जात आहे. सकाळी एक जण उठून फक्त टीव्हीमध्ये येतो आणि नुसताच हमरी तुमरीवर येतो एक तर मी राहीन नाही तर तू राहीन अशी भाषा महापुरुष संतांच्या भूमीत करत असल्याचे सांगत उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री म्हणून कामे केली नाहीत पण प्रकल्पांना स्थगिती देण्याचे काम मात्र चोख केले आहे,अशी टीकाही आ. केळकर यांनी केली.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्रजी मोदी यांना देशाने तिसऱ्यांदा कौल दिला. मात्र सलग निवडणुका नापास झालेल्या काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना स्वतःचे चिंतन करण्याऐवजी दुसऱ्याच्याबाबतीत अपप्रचार करण्यात धन्यता वाटत आहे. जातीपातीचे राजकारण करून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम या लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी केल्याचे सर्व देशाने बघितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला संविधान कधीही बदलणार नाही मात्र त्याचाही दुरुपयोग करून फेक नेरेटिव्ह पसरवण्यात आला. बाबासाहेबांचा निवडणुकीत पराभव करण्याचे पाप काँग्रेसने केले आणि त्याच कॉंगेसने संविधानावरून



देशात अशांतता माजवण्याचे काम केले. सत्ता आल्यावर दरमहा आठ हजार देण्याची घोषणा राहुल गांधी यांनी केली होती. मग ज्या राज्यात काँग्रेसची सत्ता आहे तेथील महिलांना केलेल्या घोषणाप्रमाणे का पैसे देत नाहीत असा सवाल करतानाच राहुल गांधी बेताल वक्तव्य करत असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. त्यांचे पणजोबा, आजी, वडील देशाचे पंतप्रधान होते मग त्यांनी जातीय जनगणना आणि आरक्षणावर का काम केले नाही, असा सवालही यावेळी त्यांनी उपस्थित केला. भाजप बोलते ते करून दाखवते आणि त्या अनुषंगाने केंद्र आणि राज्य सरकारकडून लोकांच्या विचारसरणीने काम सुरु आहे. आणि हि कामे जनतेपर्यंत पोहोचावा असे आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केले. विरोधक विखारी नेरेटिव्ह पसरवण्याचे काम करत आहे पण आता सुजाण जनता त्यांच्या भूलथापांना बळी पडणार नाही, असा विश्वासही आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रास्ताविकातून जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी, दिलेली जबाबदारी कार्यकर्त्यांनी यशस्वीपणे पार पाडली असल्याचे सांगितले आणि सर्वांचे त्याप्रती आभार मानले. जिल्ह्याची संघटनात्मक रचना मजबूत झाली आहे म्हणूनच आपण लोकसभा निवडणुकीत यश मिळवले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने संघटनात्मक रचनेने आपल्याला काम करायचे आहे त्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. तसेच कोकणात महायुतीने मिळविलेल्या यशाबद्दल नामदार रवींद्र चव्हाण यांचा १०० टक्के स्ट्राईक राहिला असून त्यांच्या अभिनंदनाचा ठराव यावेळी करण्यात आला.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१